# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/11/2019 (शनिवार)
# (सकाळ)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावर गौंडखैरी शिवार पैनासॉनिक गोडावुन येथे दिनांक 29/11/2019 चे 01.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शंकर फकिरराव खडसे, वय 55 वर्ष, रा. गौंडखैरी, कळमेश्वर हे गौंडखेरी येथील पॅनासॉनिक गोडावुनचे समोर सुरक्षा रक्षक म्हणुन डयुटी करीत होते. डयुटी दरम्यान विश्रांती घेण्याकरीता फिर्यादी गोडावुन जवळ लेटले असता 4 अनोळखी आरोपीतांनी जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने येवुन फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण केली. तसेच त्यापैकी एका आरोपीने हातातील कोणत्यातरी टणक वस्तुने डोक्यावर मारहाण करून फिर्यादीच्या जखमी केले. त्यानंतर आरोपीतांनी फिर्यादीला ओडत बाजुच्या गोडावुन मध्ये नेऊन त्यांचे हात पाय पांढया रंगाचे पॅकिंग करण्या पटटीने बांधले तसेच तोंडाला फिर्यादीचा दुपट्टा बांधुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 341, 393, 397 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि कर्मलवार हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावर जयदुर्गा मंगलकार्यालय कन्हान येथे फिर्यादी नामे– मनोज वल्द बालचंद गुप्ता, वय 34 वर्ष, रा. डब्लु.सी.एल. गेट वार्ड नं. 5, कांद्री कन्हान हे दि. 26/11/2019 रोजी त्यांच्या जय दुर्गा मंगल कार्यालयाचे ऑफीस मध्ये बुकींगची अडव्हान्स एकुण नगदी 37,000/–रु. ऑफीसच्या कॉउंटर मध्ये ठेवुन घरी निघुन गेले. दिनांक 27/11/2019 चे 01:00 वा. ते 02:00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने सदर रक्कम चोरी केली. फिर्यादींनी सी.सी.टी.वी. कॅमेरा पाहिले असता कथीया रंगाचा जॅकेट घातलेला अज्ञात आरोपीने खुल्या शटर मधुन ऑफीस मध्ये येवुन सदर ड्रावरमध्ये ठेवलेली रक्कम एकुण 37,000/–रु. चोरी केल्याचे दिसून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी विरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री महादेव सुरजुसे 7666640218 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर